# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 June 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ जून २०२५ दुपारी १.०० वा.

****

लातूर जिल्ह्यात उद्या सुरू होत असलेल्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस – शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचं उत्साहात स्वागत आणि विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आहे.

इयत्ता पहिलीतल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश, बूट आणि सॉक्स वितरित केले जाणार आहेत. त्यांच्या पायांचे ठसे घेण्याचा विशेष उपक्रमही राबवला जाणार आहे.

सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये मान्यवरांच्या भेटींचं नियोजन आहे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यानं एक वृक्ष लावून त्याच्या संवर्धनाचं आवाहन करण्यात येत आहे. शाळा परिसरातही वृक्षलागवड आणि स्वच्छता मोहीम राबविली गेली आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले असून, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांना गोड पदार्थ दिला जाईल.

****

१६ जूनपासून एसटी प्रशासनातर्फे "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही मोहीम राबविण्यात येत आहे. यासंदर्भातील सूचना परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत. आता विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. शाळा-महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार त्या विद्यार्थ्यांना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत.

****

श्रीक्षेत्र पंढरपूरला आषाढी एकादशीला श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी राज्यभरातून नियोजित तिथीप्रमाणं दींड्याचं मार्गक्रमण प्रस्तावित आहे. यंदाचा मुख्य सोहळा येत्या सहा जुलै रोजी आहे. सध्या विविध ठिकाणच्या दींड्याचं मराठवाड्यात आगमन झालं आहे. श्रीक्षेत्र शेगावच्या संत गजानन महाराजांची दिंडीचा आज परभणी जिल्ह्यात प्रवेश होत आहे. जळगाव जिल्ह्यातली श्री क्षेत्र मुक्ताईनगर इथली संत मुक्ताबाईची पालखी आज जालना इथं मुक्कामी आहे. परभणी जिल्ह्यात पालम तालुक्याच्या श्रीक्षेत्र फळा इथली संत मोतीराम महाराजांची दींडी आज पुणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र आळंदीकडे प्रस्थान करत आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात श्रीक्षेत्र पैठण इथली संत एकनाथ महाराजांची दींडी बुधवारी १८ जुनला प्रस्थान करत आहे.

****

उत्तराखंडमध्ये रुद्रप्रयागच्या गौरीकुंड परिसरातील खरक पर्वतीय प्रदेशात आज पहाटे साडेपाचच्या सुमारास  हेलिकॉप्टर कोसळून सात जणांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. या अपघातात विदर्भातील यवतमाळच्या वणी इथल्या खाजगी प्रवासी वाहतूक व्यावसायिक जयस्वाल पती-पत्नी आणि त्यांच्या लहान मुलीचा समावेश आहे. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर कोसळल्याची प्राथमिक माहिती मिळली.

****

आपली नाट्यसंस्कृती जपण्याचं काम अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेनं कलावंतांच्या सहकार्याने केलं असून नटराजाच्या सेवेत योगदान देणाऱ्यांचा सन्मान अभिमानाचा असल्याचं राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. दिवंगत गोविंद बल्लाळ देवल स्मृतीदिनाप्रित्यर्थ आयोजित पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. शासनाच्या मदतीनं सांस्कृतिकतेचा परीघ अधिक व्यापक करण्याचं आश्वासन शेलार यांनी यावेळी दिलं. ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुळकर्णी आणि ज्येष्ठ अभिनेते सुरेश साखवळकर यांना मंत्री शेलार यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी नाट्यक्षेत्रातील व्यावसायिक-प्रायोगिक प्रकारातील विविध पुरस्कारांचं वितरणही झालं.

****

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील जतलापूर येथील एका गावकऱ्याचा रानटी हत्तीच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. आज सकाळी साडेसहा वाजता ही घटना घडली. ओडिशावरुन छत्तीसगडमार्गे गडचिरोली जिल्ह्यात दाखल झालेले हत्ती गेल्या दोन वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यातच तळ ठोकून आहेत. तेथून दोन

हत्ती चंद्रपूर जिल्ह्यात आले असून या दोन हत्तींची दहशत जिल्ह्यातील काही भागात कायम आहे.

****

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट तसंच जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

****

जर्मनीतल्या म्युनिच इथं आयोजित आय.एस.एस.एफ. विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारतीय जोडी आर्या बोरसे आणि अर्जुन बबुता यांनी दहा मीटर एअर रायफलच्या मिश्र दुहेरीत सुवर्ण पदक पटकावण्याची कामगिरी केली आहे.

****

भूतानच्या थिंफूमध्ये आयोजित १५व्या दक्षिण आशियाई शरीरसौष्ठव आणि शरीरयष्टी क्रीडा स्पर्धेत महिलांच्या मॉडेल फिजीक १५५ सेंटीमीटर प्रकारात भारताच्या अरुणाचल प्रदेशातील याजिक हिलांग हिनं प्रथम क्रमांक पटकावला आहे.

****

ईराणवर इस्राइलनं केलेल्या हल्ल्यांमध्ये अमेरिकेची कोणतीही भूमिका नाही असं अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावरील एका संदेशात त्यांनी ही गोष्ट अधोरेखीत केली. ईराणनं अमरीकेवर हल्ला करु नये असं सूचित करताना ट्रम्प यांनी, जर असा प्रयत्न  झाला तर अमेरीकेचं सशस्त्र दल पूर्ण ताकदीनं त्याचं प्रत्युत्तर देईल असं नमूद केलं आहे.

ईराण आणि इस्राइल दरम्यान सहजतेनं सामंजस्य करारासाठी आपण मध्यस्ती करु शकतो असा दावाही ट्रंप यांनी केला आहे. तर, दुसरीकडे रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादीमीर पुतीन यांच्यासोबत ट्रम्प यांनी, पश्चिम अशियातील सध्याच्या वाढलेल्या तणावाच्या अनुषंगानं रशिया-यूक्रेन दरम्यान शांतता अबाधीत राखण्याबाबत फोनवर चर्चा झाल्याचं वृत्त आहे. इस्राइल-ईराण संघर्ष संपण्याच्या आवश्यकतेवर उभय नेत्यांनी सहमती दर्शवली.

****